**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. शिवाजी विनायक मोटे
रा. दापोडी, ता. दौंड, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, दौंड, ता. दौंड, जि. पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, दापोडी
ता. दौंड, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७२२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १९.६.२००९ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता -** श्री. शिवाजी विनायक मोटे<br>रा. दापोडी, ता. दौंड, जि. पुणे<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, दौंड, ता. दौंड, जि. पुणे श्री. राजेंद्र हरिभाऊ कोकरे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, दापोडी<br>ता. दौंड, जि. पुणे श्री. भिमराव बाळू खोमणे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१..११.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८.१.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सोबत छायांकित प्रत जोडली आहे.

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२५.११.२००८ व दि. २४.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. १९.६.२००९ रोजी अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

वारसनोंदीच्या आपल्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती वारंवार मागूनही जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, दौड यांच्याकडून दिली जात नाही. आपल्याला माहिती चुकीची व विलंबाने दिली, तसेच आपली हरकत असतानाही जागेच्या उताऱ्यावर पतसंस्थेची नोंद केली. दोन प्रतिज्ञापत्रे दिलेली असून छायांकित प्रतीवर सही घेतली आहे. त्यातील खरे प्रतिज्ञापत्र कोणते, हे स्पष्ट झालेले नाही. तीनही मिळकतीचे खरेदीखत झाले, अशी माहिती जिल्हाधिकारी यांना दिली व खरेदीखत झालेले नाही, अशी माहिती आपल्याला दिली, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. शिवाजी विनायक मोटे यांनी केले. ग्रामसेवकांनी आपले प्रतिज्ञापत्र व तक्रार अर्ज ग्रामपंचायतीच्या मासिक बैठकीत ठेवले नाही. ग्रामपंचायत मिळकत क्र.२०, ४७४ व ४६९ ला मूळ वारसांची नोंद न करता पतसंस्थेच्या नावे मिळकत करण्यात आल्यामुळे आपले अतोनात नुकसान झाले असून आम्ही वारसदार बेघर झालो आहोत, असे श्री. मोटे यांनी लेखी व तोंडी निवेदन केले.

वारसनोंद व्हावी, ही श्री. मोटे यांची मूळ मागणी असून त्या अनुषंगाने ते सातत्याने विविध पातळ्यांवर पत्रव्यवहार व अर्ज करीत आले आहेत. या मुद्दयावर यापूर्वीही माहितीच्या अधिकारात पाच वेळा त्यांनी अर्ज केले असून वेळोवेळी त्यांना माहिती देण्यात आली आहे. ते म्हणतात त्या दोन प्रतिज्ञापत्रातील मजकूर सारखाच आहे. त्यातील मूळ प्रतिज्ञापत्र ग्रामपंचायतीच्या सभेपुढे ठेवले व त्या अनुषंगाने श्री. मोटे यांना माहिती दिली. ग्रामपंचायतीचे सभावृत्तांत - पुस्तक एका दाव्याच्या संदर्भात न्यायालयाच्या ताब्यात असल्याने न्यायालयाकडून ते पुस्तक प्राप्त झाल्यावर एका मुद्दयाविषयीची माहितीच्या प्रती श्री. मोटे यांना दिल्या, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, दौंड श्री. भिमराव बाळू खोमणे यांनी केले.

श्री. मोटे यांनी केलेल्या अपिलाची सुनावणी घेऊन ग्रामसेवकांनी दिलेल्या माहितीची शहानिशा केली. दिलेली माहिती योग्य आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, दौंड, ता. दौंड श्री. राजेंद्र हरिभाऊ कोकरे यांनी केले.

श्री. मोटे यांना माहिती देण्यात आली आहे. वारसनोंदीबाबत ग्रामपंचायतीने केलेली कार्यवाही चुकीची आहे, अशी श्री. मोटे यांची तक्रार आहे. त्याविषयी उचित न्यायासनाकडे दाद मागण्याचा मार्ग त्यांना उपलब्ध आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत त्याचा निर्णय करता येणार नाही. याच मुद्दयांच्या अनुषंगाने श्री. मोटे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अन्य अपिलात (अपील क्र.२४६० /पुणे) आयोगाने दि.१६.२.२००९ रोजी दिलेल्या निर्णयानुसार वारसनोंदीच्या संदर्भातील तपशीलवार अहवाल तत्कालीन गट विकास अधिकारी (वर्ग-१) दौंड श्री. एम.एस.घुले यांनी दि.७.३.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला आहे. तो स्वयंस्पष्ट असून अपीलकर्त्याच्या प्रशासकीय कार्यवाहीविषयक मुद्दयांचे निराकरण त्यातून होते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२३.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१.

श्री. संजयकुमार बन्सल
तिहार सेंट्रल जेल नं.३,
दिल्ली ११००६४

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा कारागृह महानिरिक्षक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

**उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा तुरुंग अधिक्षक,
सांगली कारागृह , सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७६२/२००९ / सांगली |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९/६/२००९ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११/८/२००९ |
| ४ | प्रथम अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०/९/२००९ |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** माहिती-मागणी अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. संजय कुमार बन्सल यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत आवश्यक शुल्क (रु.२०/-चे कोर्ट फी स्टॅम्प/पोस्टल ऑर्डर/धनाकर्ष) जोडलेला नसल्याने त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२५-११-२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री.अरविंद वामन बहुले
१४९७/१४, भिमपुरा, कॅम्प,पुणे -१ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** संचालक, पुराभिलेख संचालनालय,
एलफिस्टन महाविद्यालय इमारत, एम.जी.रोड, मुंबई, **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** अभिलेख अधिकारी,
पुणे पुरालेखागार, महाराष्ट्र शासन, विधानभवनासमोर, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७८३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.०९.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अरविंद वामन बहुले
१४९७/१४, भिमपुरा, कॅम्प.पुणे -१

**जन माहिती अधिकारी तथा** अभिलेख अधिकारी, पुणे पुरालेखागार,
महाराष्ट्र शासन, विधानभवनासमोर, पुणे-१ श्रीमती इं.ज.शेडगे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२९.१०.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२५.१०.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२९.१२.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ७ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -** मौजे ऊरळी देवाची ता.हवेली, जि.पुणे येथील महार वतनासंबंधी सनद, वंशावळ, कैफियत इत्यादी कागदपत्र | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२५.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांत एकमत झाले नाही, त्यामुळे अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

ऊरुळी देवाची, ता.हवेली, जि.पुणे येथील महार वतनासंबंधीची सनदा आदी कागदपत्रे आपल्याला मिळत नाहीत. ब्रिटीशकालीन सनदेच्या प्रतीची मागणी आपण केली असता तिचा आढळ झाल्याचे आपल्याला कळविण्यात आले. परंतु नंतर ती उपलब्ध नसल्याचे कळविले, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.अरविंद वामन बहुले यांनी केली.

श्री.बहुले यांनी मागितल्यानुसार कागदपत्रांच्या छायांकित प्रती प्रमाणित करुन देण्यात आल्या. ब्रिटीशकालीन सनदेचा आढळ झाल्याचे त्यांना चुकून कळविण्यात आले. सनदेचा फॉर्म आढळला, असे कळवावयास हवे होते. त्याबाबत वेळोवेळी त्यांना कल्पना देण्यात येऊनही त्यांचे समाधान होत नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा अभिलेख अधिकारी, पुणे पुरालेखागार, महाराष्ट्र शासन श्रीमती इं.ज.शेडगे यांनी केले. इनाम रजिस्टरचा उतारा आपल्याला कोरा देऊन फसवणूक केली, असा आक्षेप श्री.बहुले यांनी घेतला. परंतु रजिस्टरमधील प्रत जशीच्या तशी दिली, ब्रिटीशकालीन सनदेचा नमुना फॉर्म त्यांनी मागितला होता, तो आहे तसाच देण्यात आला. तो भरुन द्यावा, अशी श्री.बहुले यांची मागणी आहे. परंतु अशा प्रकारे मूळच्या फॉर्ममध्ये नोंदी करुन देण्याचे अधिकार आपल्याला नाहीत, त्यामुळे तसे देता येणार नाही, हेही श्री.बहुले यांना वेळोवेळी स्पष्ट करण्यात आले आहे. सन २००५ पासून श्री.बहुले वेळोवेळी हीच मागणी करीत असून त्या त्या वेळी त्यांना संबंधित उपलब्ध सर्व कागदपत्रांच्या प्रती देण्यात आल्या आहेत, असे श्रीमती इं.ज.शेडगे यांनी पूरक कागदपत्रांसह तपशिलवार नमूद केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे यांचा विचार करता श्री.बहुले यांना पुरालेखागारामधील सर्व उपलब्ध माहिती देण्यात आली आहे. तेथील रजिस्टरच्या कोऱ्या

पानामध्ये नोंदी करुन देण्याची त्यांची मागणी मान्य करता येत नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा अभिलेख अधिकारी, पुणे पुराभिलेख, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा संचालक, पुराभिलेख संचालनालय, मुंबई यांनी विविध पत्रांद्वारे त्यांना स्पष्ट केले आहे. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अशा स्वरुपाची नोंदी करुन देण्याची मागणी करता येत नाही. संबंधित सनदेची कागदपत्रे आपण पाहिली आहेत, असे श्री.बहुले यांचे म्हणणे आहे. या विषयातील कागदपत्रे त्यांना अवलोकन करु देणे व त्यातील त्यांना आवश्यक असलेल्या प्रती देणे उचित होईल.

जुनी कागदपत्रे मोडी लिपीत असल्यामुळे आपल्याला ती कळणार नाहीत, असे श्री.बहुले यांनी नमूद केले. अभिलेख अवलोकनासाठी आवश्यक तर मोडी लिपीतील जाणकाराला ते घेऊन जाऊ शकतात. मात्र अभिलेख अवलोकनासाठी अपीलकर्ता स्वत: व मोडी लिपीतील जाणकार यांनाच उपस्थित राहता येईल. तसेच पेन्सिल व कोरा कागद वगळता पेन, मोबाईल फोन, कॅमेरा, पिशवी आदी साहित्य बरोबर नेता येणार नाही.

वरील बाबी लक्षात घेता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य करण्यात येत आहे.

(२) ऊरुळी देवाची, ता.हवेली, जि.पुणे येथील महार वतनासंबंधीचे पुणे पुरालेखागार, पुणे येथे उपलब्ध असलेले अभिलेख अवलोकन करण्यासाठी अपीलकर्त्याने पुराभिलेख संचालनालयाच्या नियमानुसार अर्ज करावा. अर्ज मिळाल्यापासून १५ दिवसात जन माहिती अधिकाऱ्यांनी योग्य ते शुल्क आकारुन अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करुन द्यावेत व त्यातील आवश्यक अभिलेखांच्या प्रती योग्य ते शुल्क आकारुन द्याव्यात. याबाबतच्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा अभिलेख अधिकारी, पुणे पुराभिलेख श्रीमती इं.ज.शेडगे यांनी आयोगाला त्यानंतर तीन दिवसांत सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ५ .१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

डॉ.विणा नारायण वेताळ
द्वारा,डॉ.वेताळ हॉस्पिटल, चंदननगर, पुणे ४११ ०१४ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** संचालक,
वैद्यकिय शिक्षण व संशोधन, शासकीय दंतमहाविद्यालय,
सेंट जॉर्ज हॉस्पिटल कंपाऊंड, मुंबई -१ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** अधिक्षक,
वैद्यकिय शिक्षण व संशोधन, शासकीय दंतमहाविद्यालय,
सेंट जॉर्ज हॉस्पिटल कंपाऊंड, मुंबई -१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८६२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.०९.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** डॉ.विणा नारायण वेताळ
द्वारा,डॉ.वेताळ हॉस्पिटल, चंदननगर, पुणे ४११ ०१४

**जन माहिती अधिकारी तथा** अधिक्षक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन,
शासकीय दंतमहाविद्यालय, सेंट जॉर्ज हॉस्पिटल कंपाऊंड, मुंबई -१
प्रतिनिधी डॉ.एम.पी.बनकर

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.०३.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२९.०३.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१०.०४.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.११.०४.२००८ |
| ७ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -** पीजीएम-सीईटी-२००८ या समाईक प्रवेश परीक्षेची प्रश्नपत्रिका (S.No.४४०६९७) व्हर्जन ४४, उत्तर पत्रिका व नमुना उत्तरपत्रिका (Key Answer) यांच्या छायाप्रती | |

## विवेचन

जानेवारी २००८ मध्ये झालेल्या सीईटी परीक्षेच्या निकालाबाबत संगणकामध्ये चूक झाल्याचे सरकारने मान्य केले असूनही आपल्याला प्रश्नपत्रिकांच्या प्रती संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्या कार्यालयाकडून दिल्या जात नाहीत. ४० गुणांशी संबंधित असा आपल्या भवितव्याचा हा प्रश्न असून प्रश्नपत्रिका न मिळाल्यामुळे गुणांची पडताळणी करता येत नाही, असे लेखी निवेदन अपीलकर्त्या डॉ.वीणा नारायण वेताळ यांनी आयोगाला सादर केले. त्याचाच पुनरुच्चार त्यांचे प्रतिनिधी श्री.विजयकुमार मोतीलाल मर्लेचा यांनी केला.

गुणपडताळणीबाबत अर्ज केल्यानंतर उत्तरपत्रिकेची प्रत व नमुना उत्तरे दिली जातात. त्यावरुन गुण बरोबर आहेत की नाहीत हे पाहता येते. अशा परीक्षांमधील प्रश्नपत्रिकांच्या प्रती देऊ नयेत असा निर्णय उच्च न्यायालयाने व सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी दिलेला आहे. त्यानुसार डॉ.वेताळ यांना प्रश्नपत्रिकांच्या प्रती नाकारण्यात आल्या आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.एम.पी.बनकर यांनी पूरक कागदपत्रांसह केले. मात्र उच्च व सर्वोच्च न्यायालयाचे निकाल हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अस्तित्वात येण्यापूर्वीचे असून सार्वजनिक कारभारातील पारदर्शकतेच्या या कायद्यातील सूत्रानुसार विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिकांच्या प्रती उपलब्ध होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन श्री.मर्लेचा यांनी केले.

उच्च व सर्वोच्च न्यायालयाचा निकाल लक्षात घेता प्रश्नपत्रिकांच्या प्रती विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने या न्यायालयांकडेच दाद मागण्याचा पर्याय अपीलकर्त्यास उपलब्ध आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २२ .१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. दिलीप ज्ञानेश्वर फडके
स.नं.२०/२, क्लासिक दर्शन, काशिनाथ पाटील नगर,
बालाजी नगर, पुणे-४३

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार वेल्हा, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नायब तहसीलदार वेल्हा,
ता. वेल्हा, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८८० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०.४.२००९ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** - श्री. दिलीप ज्ञानेश्वर फडके<br>स.नं.२०/२, क्लासिक दर्शन, काशिनाथ पाटील नगर,<br>बालाजी नगर, पुणे-४३<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार वेल्हा, जि. पुणे श्री. अनिल कारंडे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा नायब तहसीलदार वेल्हा,<br>ता. वेल्हा, जि. पुणे सौ. तृप्ती कोलते | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८.९.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २६.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९.१०.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>मौजे विंझर येथील गट नं. ९२ व १२८ ची विक्री झालेल्या जमिनीच्या कागदपत्रांची माहिती | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ३०.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या विशेष अपील निर्गत कार्यक्रमा त या अपिलाचा समावेश करण्यात आलेला होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. ३०.४.२००९ रोजी अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

आपल्या चुलत चुलत्याने विकलेल्या जमिनीच्या संदर्भात आपण मागितलेली माहिती अपुरी व चुकीच्या पध्दतीने दिली. उप विभागीय अधिकाऱ्यांकडून ऊर्वरित माहिती घ्यावी, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, वेल्हा व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, वेल्हा यांनी कळविले. त्यानुसार माहिती मिळाली, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. दिलीप ज्ञानेश्वर फडके यांनी केले.

श्री. फडके यांना विहित मुदतीत उत्तर दिले. त्रयस्थ व्यक्तीने जमीन खरेदी करताना सादर केलेल्या कागदपत्रांची त्यांची मागणी होती. तरीही आपल्या कार्यालयाकडील कागदपत्रांच्या प्रती दिल्या. आठ एकरापेक्षा जास्त जमीन असल्यामुळे विक्रीसाठी उपविभागीय अधिकाऱ्यांची परवानगी आवश्यक असते, ती घेतली आहे किंवा नाही, ती माहिती आपल्या कार्यालयाकडे नाही. ती उपविभागीय अधिकारी यांच्या कक्षेतील असल्यामुळे त्यांच्याकडून घेण्यास कळविले, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, वेल्हा सौ. तृप्ती कोलते व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, वेल्हा श्री.अनिल कारंडे यांनी केले.

त्रयस्थ व्यक्तीच्या जमीन खरेदी संदर्भातील माहिती श्री. फडके यांनी मागितली असूनही जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी ती देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २३.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. एन. डी. चौगुले
२४, गणेश नगर, पंढरपूर,
जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** उप शिक्षणाधिकरी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९ / २००९ / सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.६.२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २९.७.२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.८.२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.१.२००९ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - भविष्य निर्वाह निधी खाते क्र. S.P.F. जुना खाते क्र. ४०९० व नवीन खाते क्र. ७६०५ मध्ये भोळे आयोगाच्या दिनांक २१.१२.१९७८ च्या शासन निर्णयानुसार दिनांक १.४.१९७६ ते ३०.११.१९७६ या कालावधीतील जुन्या व नव्या वेतन श्रेणीच्या फरकाची रक्कम भविष्य निर्वाह निधीत जमा केली होती काय? जमा केली असल्यास केव्हा व कोणत्या पध्दतीने याचा तपशील. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. एन. डी. चौगुले यांनी जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), सोलापूर यांच्याकडे भविष्य निर्वाह निधित रक्कम जमा करण्याबाबतची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी माहिती चुकीची व दिशाभूल करणारी दिली व अपिलीय प्राधिकारी तथा

शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी सुनावणी न घेताच निर्णय दिला या कारणावरुन श्री. एन. डी. चौगुले यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

अपिलासोबतची कागदपत्रे पाहता भविष्य निर्वाह निधीच्या फरकाची रक्कम जमा करणे / न करणे हा प्रशासकीय कार्यवाहीचा विषय असून ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत येत नाही. परंतु माहिती अन्य कार्यालयाकडून घेण्यास सांगण्याऐवजी जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी मूळ माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(३) अन्वये अर्ज ५ दिवसांत संबंधित कार्यालयाकडे पाठविणे आवश्यक होते. अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर हे कागदपत्रांच्या आधारे निर्णय देऊ शकतात. त्यामुळे सुनावणी न घेतल्याची तक्रार दाखलपात्र ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१) अपील अंशतः मान्य.

२) जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी संबंधितांकडून माहिती प्राप्त करुन घेऊन आदेश मिळाल्यापासून आठ दिवसांत अपीलकर्त्यास निःशुल्क द्यावी व त्याचा पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३१-१०-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.लक्ष्मण कृष्णा चव्हाण
मु.मुरडवाक, पो.धोंडेवाडी, ता.खटाव, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस अधीक्षक,
सातारा, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
दहिवडी विभाग, कॅम्प वडूज, मु.पो.वडूज(वाकेश्वर मार्ग). ता.खटाव, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९४ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५ .२ .२००९ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
दहिवडी विभाग, कॅम्प वडूज, मु.पो.वडूज(वाकेश्वर मार्ग). ता.खटाव, जि.सातारा
श्री.सोपान महादेव जमदाडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.८.१२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ६.१.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २३.३.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १२.११.२००७ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. |
| --- | --- |

## विवेचन

आपल्यावर ज्या तक्रार अर्जानुसार पोलीस कारवाई झाली त्याची मागणी अपीलकर्ता श्री.लक्ष्मण कृष्णा चव्हाण यांनी केली होती. हा अर्ज दाखल करून घेतलेला नाही, पुढील चौकशी झालेली नाही, असे श्री.चव्हाण यांना वेळीच कळविण्यात आले. त्या आधी त्यांच्याविरूध्द झालेल्या अर्जानुसार केलेल्या कार्यवाहीची प्रत त्यांना देण्याची तयारी दर्शविलेली होती. काही मुद्दयांचे स्पष्टीकरण त्यांनी मागितले असून तेही देण्यात आले, असे जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, दहिवडी विभाग, कॅम्प वडूज, ता.खटाव, जि.सातारा श्री.सोपान महादेव जमदाडे यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. ते रास्त आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३१.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.लक्ष्मण कृष्णा चव्हाण
मु.मुरडवाक, पो.धोंडेवाडी, ता.खटाव, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस अधीक्षक,
सातारा, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
दहिवडी विभाग, कॅम्प वडूज, मु.पो.वडूज(वाकेश्वर मार्ग). ता.खटाव, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९४ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५ .२ .२००९ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
दहिवडी विभाग, कॅम्प वडूज, मु.पो.वडूज(वाकेश्वर मार्ग). ता.खटाव, जि.सातारा
श्री.सोपान महादेव जमदाडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.८.१२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ६.१.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २३.३.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १२.११.२००७ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आपल्यावर ज्या तक्रार अर्जानुसार पोलीस कारवाई झाली त्याची मागणी अपीलकर्ता श्री.लक्ष्मण कृष्णा चव्हाण यांनी केली होती. हा अर्ज दाखल करून घेतलेला नाही, पुढील चौकशी झालेली नाही, असे श्री.चव्हाण यांना वेळीच कळविण्यात आले. त्या आधी त्यांच्याविरूध्द झालेल्या अर्जानुसार केलेल्या कार्यवाहीची प्रत त्यांना देण्याची तयारी दर्शविलेली होती. काही मुद्दयांचे स्पष्टीकरण त्यांनी मागितले असून तेही देण्यात आले, असे जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, दहिवडी विभाग, कॅम्प वडूज, ता.खटाव, जि.सातारा श्री.सोपान महादेव जमदाडे यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. ते रास्त आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३१.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. प्रल्हाद मोतीराम नलवडे
रा. अध्यक्ष व्यंकटेश्वरा वडार युवक बहुउद्देशिय
कल्याणकारी विकास संस्था, सुर्यवंशी मळा,
वडार गल्ली, कराड, जि. सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप विभागीय अधिकारी,
कराड उपविभाग, कराड, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९७ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.८.२००८ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. प्रल्हाद मोतीराम नलवडे
रा. अध्यक्ष व्यंकटेश्वरा वडार युवक बहुउद्देशिय
कल्याणकारी विकास संस्था, सुर्यवंशी मळा,
वडार गल्ली, कराड, जि. सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी, सातारा

**जन माहिती अधिकारी** तथा उप विभागीय अधिकारी,
कराड उपविभाग, कराड, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.३.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०.३.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.४.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.५.२००७ |

८ <u>**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**</u>

बेकायदेशीर बांधकामाबाबतच्या तक्रारीवरील चौकशी अहवालाची प्रत

## विवेचन

बेकायदेशीर बांधकामाबाबतच्या तक्रारीवरील चौकशी अहवालाची प्रत आपल्याला दिलेली नाही. जिल्हाधिकारी, सातारा यांनी दि.१९.२.२००६ रोजी उपविभागीय अधिकारी, कराड यांना तक्रारीबाबत चौकशी करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या होत्या. परंतु पंधरा महिन्यांनंतरही त्याची माहिती दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. प्रल्हाद मोतीराम नलवडे यांनी केली.

श्री. नलवडे यांनी केलेल्या तक्रारीबाबत चौकशीची प्रक्रिया चालू होती, व जिल्हाधिकाऱ्यांना अहवाल पाठविलेला नव्हता, तसे त्यांना विहित मुदतीत कळविण्यात आले. आता ते प्रकरण नगर भूमापन अधिकाऱ्यांकडे अहवालसाठी आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी डॉ. स्वाती देशमुख-पाटील यांनी केले. श्री. नलवडे यांनी प्रथम अपील केलेले नव्हते, असे अपिलीय प्राधिकारी यांनी सांगितले.

सादर न केलेल्या अहवालाची प्रत देता येत नाही, हे जन माहिती अधिकारी डॉ. स्वाती देशमुख-पाटील यांनी विहित मुदतीत दिलेले उत्तर योग्य आहे. तथापि संबंधित अहवालाची प्रक्रिया पंधरा दिवसांत पूर्ण करुन अपीलकर्त्यास त्याची प्रत सादर करावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि.१.९.२००८ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, सातारा यांना चौकशी अहवाल सादर करण्यात आला व त्याची प्रत श्री. नलवडे यांना देण्यात आली, असे जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी डॉ. स्वाती देशमुख-पाटील यांनी दि.५.९.२००८ च्या पत्रान्वये विषयांकित अहवालाच्या प्रतीसह आयोगाला कळविले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १५.१०.२००९**